Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 382-387

DOI: 10.5281/zenodo.10129546

Original Research Article

# म.गांधीजी यांचे शिक्षण विषयक विचार-एक अध्ययन

श्री गायकवाड यादव कामाजी[1] आणि प्रा. डॉ. शारदा गोविंदराव बंडे[2]

[1]प्राथमिक शिक्षक तथा संशोधक (एम.ए.इतिहास नेट सेट; एम.ए.मराठी नेट सेट; एम.ए.राज्यशास्त्र नेट सेट; एम.ए.अर्थशास्त्र सेट बि.एड.डी.एड.)

[2]संशोधन मार्गदर्शक तथा विभाग प्रमुख, इतिहास विभाग, स्वा. सै. सुर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा (जं.) जि. परभणी ४३१५११ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: [1]ykgaikwad33@gmail.com; [2]dr.sharadabande17400@gmail.com

Received: 09 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रस्तावना

म. गांधीजी यांची भारताच्या जडणघडीत घडणीत अतिशय महत्त्वाचे योगदान आहे.गांधीजींना केवळ स्वातंत्र्यचळवळी पुरते मर्यादित न ठेवता आपण त्यांच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि आर्थिक बाबतचा विचार देखील अभ्यासणे गरजेचे आहे. म.गांधीजींना शोषण मुक्त,समानतेच्या तत्त्वावर एकत्र राहणारा ग्रामीण समाज निर्माण करायचं होता. म. गांधीजींच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वांमध्ये सत्याचे प्रयोग,अहिंसा व सत्याग्रह या मार्गांचा अवलंब केला; त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये एक महान क्रांतिकारक म्हणून म.गांधीजी यांना ओळखले जाते. गांधीजी यांचे विचार काही वेळा प्रतिगामी स्वरूपाचे होते;जसे की ती वर्णव्यवस्थेला पुराणातील आधार आहे असे मानत होते.

स्वातंत्र्य संग्रामातील चळवळी सोबतच म.गांधीजी यांनी सामान्य लोकांच्या समस्या सोडविण्याची कार्य केले. अस्पृश्यता निवारण, खादीचा प्रचार ग्रामीण कुटिरोद्योग यांना चालना, हिंदू-मुस्लिम ऐक्य, हिंदी भाषेचा प्रचार-प्रसार, दारूबंदी यांचा समावेश होतो. या सर्वांसोबतच म. गांधीजी यांनी शिक्षणाच्या बाबतीत देखील आपले विचार मांडले व एका नवीन शिक्षण पद्धती विषयी भाष्य केले. म. गांधीजी यांच्या मते शिक्षण म्हणजे चारित्र्य निर्माण करणे होय.शिक्षण पद्धती तीच आदर्श असते ज्यामधून सुदृढ चरित्र्यसंपन्न नागरीक तयार होतात. शिक्षणाचा अर्थ बालक किंवा मनुष्याचा मन मेंदू मस्तिष्क यांचा विकास करणे होय.

**उद्दिष्टे**

म. गांधीजी यांचे शिक्षण विषयक विचार एक अध्ययन या विषयावर संशोधन पेपर लिहिताना पुढील प्रमाणे उद्दिष्टे ठेवलेली आहेत.

१. म.गांधीजी यांचे शिक्षणाविषयी विचार जाणून घेणे.

२. म.गांधीजी यांची 'वर्धा शिक्षण योजना' याची माहिती घेणे.

३. म.गांधीजी यांचे उच्च शिक्षणा बाबतचे विचार जाणून घेणे.

४. म.गांधीजी यांच्या शिक्षणाविषयीच्या विचारांचा सध्याचा शिक्षण पद्धतीवर दिसून येत असलेला प्रभाव जाणून घेणे.

**जीवनचरित्र**

म.गांधीजी यांचा जन्म 2 ऑक्टोबर 1869 रोजी गुजरात मधील पोरबंदर या ठिकाणी झाला. गांधीजींचे कुटुंब धार्मिक विचारांचे होते; त्यांचे वडील पोरबंदरचे दिवाण होते, त्यामुळे घरची परिस्थिती एका सुख वस्तु कुटुंबासारखी होती. त्यांच्या कुटुंबात धार्मिक विधी सतत होत असायचे कारण त्यांची आई एक धार्मिक स्वभावाची स्त्री होती. पूजाअर्चा केल्याशिवाय जेवन देखील करणे वर्ज्य मानत होती. म.गांधीजी यांच्या वडिलांची बदली पोरबंदर या ठिकाणाहून राजकोट येथे झाली त्यामुळे गांधीजी यांचे प्राथमिक शिक्षण राजकोट या ठिकाणी पूर्ण झाले. म. गांधीजी म्हणतात की शालेय जीवनामध्ये ते एक अत्यंत सामान्य विद्यार्थी होते .या विषयीचा उल्लेख त्यांनी आपल्या आत्मचरित्रामध्ये केला आहे. म. गांधीजींना शालेय पुस्तकाव्यतिरिक्त इतर पुस्तके वाचण्याचा फार कंटाळा असायचा त्यामुळे त्यांची शालेय शिक्षणातील प्रगती बेताचीच असायची. 1887 साली म. गांधीजींनी मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली.

म.गांधीजी यांच्या वडिलांच्या निधनानंतर त्यांच्या वडिलांच्या मित्राच्या सल्ल्याने मॅट्रिक नंतरचे शिक्षण इंग्लंडमध्ये घेण्यासाठी इंग्लंडला जाण्याचा त्यांनी निर्णय घेतला. इंग्लंडमध्ये गांधीजी यांच्या कच्च्या इंग्रजी मुळे त्यांना त्रास होत होता. कारण गांधीजी यांची इंग्रजी बेताचीच होती त्यामुळे त्यांना अनेकांनी इंग्लंडमधील मॅट्रिकची परीक्षा देण्याचा सल्ला दिला. या सल्ल्यानुसार म.गांधीजी यांनी इंग्लंडमधील मॅट्रिकची परीक्षा दिली परंतु ते नापास झाले. त्यानंतर पुन्हा त्यांनी जोमाने अभ्यास करून मॅट्रिकची परीक्षा पास झाले. मॅट्रिक पास झाल्यानंतर तीन वर्षाची बॅरिस्टर ही पदवी घेतली व इंग्लंडच्या कोर्टात वकिली साठी नाव नोंदविले. म.गांधीजी त्यांच्या आत्मचरित्रात उल्लेख करतात की नाव नोंदणी मी केली खरी परंतु मला वकिली करता येत नव्हती. त्यामुळे त्यांनी पिंक्ट नावाच्या व्यक्तीचे मार्गदर्शन घेऊन वकिलीचे ज्ञान प्राप्त करण्याचे ठरविले.

वकिलीचे ज्ञान प्राप्त केल्यानंतर 1891 मध्ये गांधीजी भारतात परत आले. 16 नोव्हेंबर 1891 रोजी मुंबईच्या वरिष्ठ न्यायालयात वकील म्हणून नाव नोंदविले परंतु या ठिकाणी ही अडचणी त्यांचा पाठलाग सोडत नव्हत्या.खूप दिवस झाले तरी एकही केस त्यांच्याकडे येत नव्हती. त्यांना एक केस भेटली परंतु तिथेही न्यायाधीशाच्या समोर त्यांना बोलता आले नाही. या सर्व गोष्टीचा परिणाम म्हणून त्यांनी वकिली सोडून द्यायचे आणि शिक्षक व्हायचे असा निर्णय घेतला. शिक्षक होण्यासाठी त्यांनी अर्ज केला परंतु तो ही अर्ज रद्द करण्यात आला कारण म.गांधीजी कडे शिक्षक होण्यासाठी बी.ए. ही पदवी नव्हती. एवढ्या अडचणीमध्ये अशातच त्यांना दक्षिण आफ्रिकेमध्ये दादा अब्दुल्ला अँड कंपनी यांची वकिली करण्यासाठीची एक जाहिरात त्यांच्या बंधू कडून कळाली आणि त्यांनी हा प्रस्ताव स्वीकारला व दक्षिण आफ्रिकेत जाण्याचे ठरवले. 1893 मध्ये ते दक्षिण आफ्रिकेसाठी निघाले आणि दक्षिण आफ्रिकेतील जीवनापासूनच

म.गांधीजी यांचे संपूर्ण जीवन बदलले. दक्षिण आफ्रिकेमध्ये काळे आणि गोरे हा भेदभाव मोठ्या प्रमाणात होता त्या ठिकाणी त्यांनी कृष्णवर्णीय लोकांच्या बाजूने लढण्यासाठी संघर्ष केला.दक्षिण आफ्रिकेमध्ये नेटोल इंडियन काँग्रेस नावाची संघटना स्थापन केली व या संघटनेमार्फत तेथील भारतीयांना त्यांचे हक्क मिळवून दिले. त्या ठिकाणी त्यांनी फिनिक्स आश्रम स्थापन करून शिक्षणाविषयी चे नवीन प्रयोग केले.

**म. गांधीजी यांचे शिक्षणाविषयी विचार**

म.गांधीजी तत्कालीन शिक्षण पद्धतीवर अतिशय नाराज होते. शिक्षण म्हणजे व्यक्तीचा मन मेंदू मस्तिष्क यांचा सर्वांगीण विकास असे ते सांगत होते ;परंतु तत्कालीन शिक्षण पद्धतीमध्ये बालकांच्या सर्वांगी विचार आणि विकासाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले होते. कोणत्याही देशाच्या शिक्षण व्यवस्थेमधून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास,स्वावलंबन आणि देश-हित या गोष्टी साध्य होत असतील तर ती शिक्षण पद्धती आदर्श शिक्षण पद्धती असते.

भारतात देण्यात येणाऱ्या शिक्षण पद्धतीतून समाजातील सर्व स्तरातील लोकांना शिक्षण भेटत नव्हते कारण बहुसंख्य समाजाला शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे कटकारस्थान येथील धर्मपंडितांनी निर्माण केले होते आणि त्याचाच एक भाग ब्रिटिश शिक्षण पद्धती होती.कारण ब्रिटिशांनी सर्वांना शिक्षण देण्याऐवजी फक्त काही लोकांनाच शिक्षण देण्यावर भर दिला होता.त्याला मेकॅलेची शिक्षण पद्धती किंवा मेकालेचा शिक्षणाचा झिरपता सिद्धांत असे म्हणतात. शिक्षणाच्या बाबतीत बोलायचे झाले तर ही शिक्षण पद्धती अतिशय कुचकामी अशी होती;कारण म.गांधीजी यांच्या मते इंग्रजांनी दीडशे वर्षे भारतावर राज्य केल्यानंतर देखील दहा ते पंधरा टक्के लोकांना शिक्षण घेता आले होते.

कोणतेही परकीय शासनव्यवस्थेला आपला राज्य कारभार चालवता येईल एवढेच लोक सुशिक्षित करायचे असतात आणि हेच इंग्रजांनी केलं. त्यांनी आपल्या राज्यकारभारासाठी जेवढे आवश्यक आहे तेवढेच शिक्षण दिले. त्यामुळे म.गांधीजी या शिक्षण पद्धतीवर नाराज होते व त्यांनी नवीन शिक्षण पद्धती विषयीचे आपले विचार मांडले.

**वर्धा शिक्षण योजना**

म.गांधीजींनी या योजनेचा वापर सर्वप्रथम दक्षिण आफ्रिकेतील फिनिक्स या आश्रमामध्ये केला होता. त्याचबरोबर त्यांनी साबरमती आश्रमात देखील या शिक्षण पद्धतीचा काही प्रमाणामध्ये वापर केला होता. दक्षिण आफ्रिकेतील अनुभव व साबरमती आश्रमामध्ये केलेले प्रयोग या दोन्हीच्या परिणाम म्हणून वर्धा शिक्षण योजना उदयाला आलेली दिसते.म.गांधीजींच्या मते सध्याच्या शिक्षण पद्धतीनुसार ग्रामीण भागातील गरजा पूर्ण होत नाहीत. परंतु त्याबरोबरच शहरवासीयांनाही काही प्राप्त होत नाही. म.गांधीजी यांच्या मते इंग्रजी शिक्षण केवळ उच्च शिक्षणासाठी तयार होण्याचे साधन बनले आहे. या शिक्षणामधून प्राथमिक व माध्यमिक पातळीवर काहीही साध्य होत नाही. भारतीय शिक्षण व्यवस्थेचा विचार करणे ही इंग्रज शासनाची जबाबदारी होती. परंतु इंग्रज शासनाने केवळ इंग्रजी शिकविण्यापुरती शिक्षण व्यवस्था मर्यादित केली. इंग्रजांनी विचार करायला पाहिजे होता की भारत हा कृषीप्रधान देश आहे आणि कृषीवर अवलंबून असणारी 50% जनता ही ग्रामीण भागामध्ये राहते. त्यांच्या गरजा कोणत्या आहेत आणि त्या शिक्षणामधून पूर्ण होतात का? या गोष्टीचा सांगोपांग विचार इंग्रजांनी अजिबात केला नाही. या सर्व प्रकारातून म.गांधीजींनी एक नवीन शिक्षण योजना मांडली. त्या शिक्षण योजनेलाच “वर्धा शिक्षण योजना” असे म्हणतात. या शिक्षण योजनेसाठी वेगवेगळी नाव देण्यात आली. यामध्ये ‘नई तालीम’, ‘बेसिक शिक्षा’, ‘बुनियादी शिक्षण योजना’, ‘मूलउद्योग शिक्षण योजना’ अशा प्रकारची वेगवेगळ्या भाषेत वेगवेगळे नावे देण्यात आली.

वर्धा शिक्षण योजना लागू करण्यासाठीचे मूळ तत्त्वज्ञान म.गांधीजींच्या दक्षिण आफ्रिकेतील फिनिक्स स्कूलमध्ये सापडते. त्याचबरोबर या शिक्षण योजनेचा वापर म.गांधीजी यांनी असहकार चळवळीच्या वेळी देखील केलेला दिसून येतो. असहकार चळवळ चालू होती त्यावेळेस सर्व सरकारी शाळावर बहिष्कार टाकून स्वदेशी शिक्षण पद्धतीचा वापर

करण्यात येणार होता. त्यावेळी म.गांधीजी यांनी वर्धा शिक्षण योजनेची माहिती आणि स्वरूप त्यांच्या 'हरिजन' या वृत्तपत्रांमध्ये 1932 साली मांडले परंतु विस्तृत स्वरूपात वर्धा शिक्षण योजना त्यांनी 1937 साली वर्धा येथे जाहीर केली. त्यामुळे या शिक्षण योजनेस "वर्धा शिक्षण योजना" असे म्हणतात. 1937 मध्ये वर्धा या ठिकाणी श्रीमंत नारायण अग्रवाल यांच्या संयोजनाखाली 'वर्धा शिक्षण संमेलन' आयोजित करण्यात आले होते. या संमेलनामध्ये भारतातील वेगवेगळया राज्यातून प्रांतांतून वेगवेगळे भाषिक शिक्षण-तज्, समाज सुधारक,विचारवंत यांनी सहभाग घेतला होता. या संमेलनाचे अध्यक्ष 'म.गांधीजी' हे होते. म.गांधीजी यांनी अध्यक्ष स्थानावरून 'वर्धा शिक्षण योजनेचे' स्वरूप सर्वांसमोर मांडले. वर्धा शिक्षण योजनेमध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्त्व देण्यात आले होते. इंग्रजी मुळे अनेकांना शिक्षणात अडचणींना समोर जावे लागत असल्याने वर्धा शिक्षण योजनेत इंग्रजी हा विषय ठेवण्यात येणार नव्हता.

विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञान देण्यात येणार होते. व्यावसायिक शिक्षणाच्या ज्ञानामधून विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत कमविण्याचे ज्ञान देखील प्राप्त होईल त्यामुळे व्यावसायिक शिक्षणाचा समावेश वर्धा शिक्षण व्यवस्थेमध्ये करण्यात आला होता.व्यावसायिक शिक्षणामध्ये सुत कातने,शिलाई काम, खेळणे बनवणे,गुळ बनवणे यासारखे कमी खर्चात तयार होणारे कुटीरोद्योग समाविष्ट करण्यात आले होते.म.गांधीजी यांच्या मते उच्च शिक्षणाचे सर्वच जबाबदारी केंद्र सरकारने घ्यायला पाहिजे.विद्यापीठांचे काम केवळ परीक्षा घेणे व अभ्यासक्रम तयार करणे एवढेच ठेवण्यात यावे.म.गांधीजी यांच्या वर्धा शिक्षण योजनेत धार्मिकतेला कोणते प्रकारचे स्थान देण्यात आले नव्हते. सर्व धर्मांसाठी ही वर्धा शिक्षण योजना स्वावलंबनाचे धडे देणारी होती. या योजनेच्या माध्यमातून देशातील दारिद्र्य,निरक्षरता दूर होण्यास मदत मिळणार होती. त्याचबरोबर शिक्षणाविषयीची अनास्था दूर होऊन सर्व सुशिक्षित झाले तर त्यांचा फायदा भारतीय स्वातंत्र्य चळवळीस मनुष्यबळ म्हणून होणार होता.

म.गांधीजी यांनी वर्धा येथील वर्धा शिक्षण संमेलनात मांडलेल्या शिक्षण योजनेवर विचार करण्यासाठी जाकीर हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमण्यात आली होती.जाकीर हुसेन हे जामीया मिलिया इस्लामिया या विद्यापीठाचे कुलगुरू होते. त्यामुळे या कमिटीला 'जाकीर हुसेन कमिटी' या नावाने इतिहासात ओळखले जाते. जाकीर हुसेन कमिटीने वर्धा शिक्षण योजनेविषयी मांडलेल्या ठरावानुसार अभ्यासक्रम तयार करण्याची जबाबदारी सोपीविण्यात आली होती. या कमिटीने आपले रिपोर्ट दोन वेळा सरकारला सादर केली होते.

म.गांधीजी यांच्या या वर्धा शिक्षण योजनेत मातृभाषेतून शिक्षण देण्यावर भर देण्यात आलेला होता. इंग्रजी हा विषय अभ्यासक्रमातून वगळण्यात आला. इंग्रजी ऐवजी एका व्यावसायिक विषयाचा समावेश अभ्यासक्रमात करण्यात आला होता. म.गांधीजी यांचे म्हणणे होते की विद्यार्थ्यांच्या कमाईतून काही प्रमाणात शिक्षकाचा पगार देखील निघायला पाहिजे होता.त्यामुळे शिक्षणाचा प्रसार सर्वत्र तळागाळात होण्यास फायदा होईल. इंग्रजीला विरोध होता परंतु राष्ट्रभाषा म्हणून हिंदीचा समावेश सर्वच वर्गात अनिवार्यपणे करण्यात आलेला होता. हरिपूर येथील काँग्रेस अधिवेशनात वर्धा शिक्षण योजनेचा स्वीकार करून संपूर्ण देशात ही योजना लागू करण्याचा ठराव घेण्यात आला; परंतु वर्धा शिक्षण योजना लागू करणे सोपे नव्हते. त्याचे कारण वर्धा शिक्षण योजनेनुसार निर्माण करण्यात आलेल्या नवीन अभ्यासक्रमासाठी शिक्षक उपलब्ध होण्याची खूप मोठी अडचण होती. यावर पर्यायी म्हणून 1938 साली ट्रेनिंग कॉलेजची स्थापना करण्यात आली व त्यांच्या मार्फत तीन तीन महिन्यांचे ट्रेनिंग देऊन शिक्षक प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले.

1939 मध्ये दुसरे महायुद्ध चालू झाले; काँग्रेसला विश्वासात न घेता इंग्रजांनी भारताला युद्धात ओढले याचा विरोध म्हणून सर्व प्रांतातील काँग्रेस मंत्रिमंडळाने राजीनामे दिले. परिणामी भारतात ज्या ठिकाणी काँग्रेसचे मंत्रिमंडळ होते ते बरखास्त झाले. याचा परिणाम म्हणून वर्धा शिक्षण योजनेच्या अंमलबजावणीत थोडी शिथिलता आली. 1939 रोजी खेर समितीने वर्धा शिक्षण योजना ज्याला की बेसिक शिक्षा या नावाने संबोधून काही शिफारशी सरकारला केल्या त्यापैकी अनेक शिफारसी सरकारने स्वीकारल्या व त्यांचा समावेश 1944 सालच्या सार्जंट शिक्षण योजनेत करण्यात आला.

**म. गांधीजी यांचे उच्च शिक्षणाविषयीचे विचार**

उच्च शिक्षणाचे सर्वात मोठे टीकाकार-विरोधक म्हणून म.गांधीजी यांना ओळखता येईल. म.गांधीजी यांच्यामते आधुनिक विद्यापीठातून देण्यात येणारे साहित्याचे शिक्षण निव्वळ निरर्थक आहे; कारण अशा शिक्षणामधून केवळ बेकारांच्या फौजा तयार करण्याचे काम करण्यात येते. इंग्रजी माध्यमातून देण्यात येणाऱ्या या शिक्षणातून आपल्या देशाच्या बौद्धिकतेवर व नैतिकतेवर आघात करण्यात येतो. म. गांधीजी यांनी त्यांची स्वतःची नात कु.मधुबेन गांधी हिची उच्च शिक्षण घेण्याची इच्छा असून देखील तिला उच्च शिक्षण घेऊ दिले नव्हते. त्यांच्या मतानुसार उच्च शिक्षण म्हणजे केवळ नोकरदार तयार करण्याचा कारखाना आहे. आत्मविश्वास आणि आत्म गौरव असणारी, नवीन काहीतरी करण्याची उमेद असणारी पिढी घडविण्याची ताकद या शिक्षणामध्ये नाही. विद्यापीठामधून राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती,त्याग व सेवा देणारी, देशासाठी सदैव तत्पर असणारी पिढी घडविणारे शिक्षण द्यावयास हवे. म.गांधीजी उच्च शिक्षणाबाबत अज्ञानी होते असेही म्हणता येत नाही कारण 1920 च्या असहकार आंदोलनात त्यांनी स्वतःची शाळा, कॉलेजे, विद्यापीठ स्थापण्याचे आव्हान केले होते. त्या आव्हानाला प्रतिसाद म्हणूनच गुजरात विद्यापीठ, नॅशनल कॉलेज यांची स्थापना करण्यात आली होती. त्याबरोबर गुजरात विद्यापीठ व बिहार विद्यापीठाचे आजीवन चान्सलर म. गांधीजी हेच होते.

म.गांधीजी यांच्यामते उच्च शिक्षणातील कला विषयाचे देण्यात येणारे ज्ञान निव्वळ व्यर्थ व कुचकामी स्वरूपाचे आहे; कारण कॉलेजमधून शिक्षण घेणारे लोक मानसिक व शारीरिक दृष्ट्या पंगू होतात. यांच्या मतानुसार विद्यापीठाचा उद्देश प्राचीन संस्कृतीला आधुनिक विचाराची जोड देऊन नवीन संस्कृती निर्माण करण्याचा असायला पाहिजे होता. विद्यापीठीय शिक्षण विद्यार्थ्यांना त्यांच्या पालनपोषणासाठी आवश्यक असणारे सर्व गुण त्यांच्यामध्ये भरण्यास सक्षम असले पाहिजे किंवा असे शिक्षण देणारे केंद्र झाले पाहि.जे यासाठी शिक्षणाचे माध्यम ज्या त्या राज्यामधील किंवा प्रांतामधील स्थानिक भाषा असायला पाहिजे. विद्यापीठ स्थापन करणे ही लोकशाही राज्यांचे कामच नाही. लोकांना गरज असेल तर त्यांनी स्वतःच्या पैसा जमा करून स्वतः विद्यापीठ स्थापन करावीत; अशी स्थापन केलेले विद्यापीठ देशासाठी अभिमानास्पद असतील. म. गांधीजींच्या मते विद्यापीठात चांगले ग्रंथालय असावीत त्याचबरोबर तिथे रसायनशास्त्रज्ञ, इंजिनियर, सेना यांचा समावेश करावा जेणेकरून देशासाठी सेवा करणारी तरुण निर्माण होतील.

म.गांधी यांच्यामते यांत्रिक शिक्षण व इंजिनिअरिंगचे शिक्षण सरकारी विद्यापीठातून देण्याची आवश्यकता नाही; कारण त्यासाठी ज्यांना तंत्रज्ञ व इंजिनियर ची गरज आहे ह अशांनी कॉलेज उघडावे. उदाहरणार्थ टाटाच्या कारखान्यात इंजिनियर ची गरज असेल तर त्यांनी स्वतःची कॉलेज उघडावे म्हणजे ज्यांना आवश्यकता असेल त्यांनी स्वतः खर्च करून स्वतःसाठी आवश्यक मनुष्यबळ तयार करावे. ज्या देशात 50 टक्के जनता कृषीवर अवलंबून आहे तेथे कृषी पदवी देण्याऐवजी प्रत्यक्ष शेतीतील ज्ञान द्यावे व त्या शिक्षणाने शेतकऱ्याची व्यावसायिक व्यवहारिक गरज पूर्ण व्हावी. त्यांचे म्हणणे होते की मूल उद्योग शिक्षण पद्धती प्राथमिक पासून विद्यापीठ शिक्षण पद्धतीपर्यंत लागू करणे आवश्यक आहे. विद्यापीठ शिक्षणाला शहराकडून गावाकडे ग्रामीण गरजा पूर्ण करण्यासाठी स्थलांतर करण्याची गरज त्यांनी मांडलेली दिसते. म. गांधीजी यांनी शिक्षणामध्ये उद्योगावर भर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यानुसारच विद्यापीठ अनुदान आयोगाने स्वतः त्यावर भर दिला आहे. 1967 च्या राष्ट्रीय शिक्षण नीती मध्ये पदवी व पदव्युत्तर शिक्षणात बदल करण्याची शिफारस देखील करण्यात आलेली आहे.

**उपसंहार**

१. म.गांधीजीची स्वावलंबी शिक्षण व्यवस्था म्हणजेच स्वतःच्या खर्चावर शाळा चालविणे हे अव्यावहारिक आहे. सार्जंट कमिटीच्या रिपोर्टनुसार विद्यार्थ्यांनी बनवलेल्या वस्तू विकून खर्च भागविणे ही अव्यवहारिकपणाचे आहे.

२. मुलउदयोग शिक्षण किंवा बुनियादी शिक्षण व्यवस्था यामध्ये जास्त प्रमाणात ग्रामीण भागाचा विचार करण्यात आला;त्यामुळे शहरी समस्या कडे पूर्णपणे डोळेझाक करण्यात आली.त्यामुळे ही शिक्षण व्यवस्था सर्व मान्य होत नाही.
३. बुनियादी शिक्षण व्यवस्थेसाठी तीन महिन्याचा कोर्स पूर्ण करणारे शिक्षक नेमणे म्हणजे शिक्षण व्यवस्थेची थट्टा होती.
४. सुतकताई,चरका चालवणे म्हणजे बाल केंद्रित शिक्षण नाही; त्यामध्ये सर्व विषयांचा समावेश करण्यात येत नाही.

**संदर्भ ग्रंथ**

१. माझे सत्याचे प्रयोग,मोहनदास करमचंद गांधी.
२. बुनियादी शिक्ष, मोहनदास करमचंद गांधी, अहमदाबाद, 1985.
३. राष्ट्रभाषा का प्रश्न, म.गांधी, दिल्ली, 1943.
४. हरिजन, पुणे. (1937 ते 1948).
५. म. गांधी, धनंजय किर,मुंबई 1973.
६. भारतीय शिक्षा के प्रवर्तक, आत्मानंद मिश्र, आग्रा,1972.
७. Gandhi: The Teacher, Asha Devi Aryanayakam, Bombay,1966.
८. The Educational Philosophy Of Mahatma Gandhi, M.S.Patel, Ahemadabad,1953.
९. Gandhian Values For Higher Education ,T.K.N.,Ahemadabad.